# मुंबई मेट्रोच्या वाट्याला पाच टक्के निधी



म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## केंद्राकडून भूमिगत मेट्रो ३साठी अंतिम निधीवाटप होणार

केंद्रीय अर्थसंकल्पात देशभरातील मेट्रो प्रकल्पांसाठी घोषित एकूण निधीत मुंबईतील मेट्रोचा हिस्सा जवळपास पाच टक्के आहे. हा निधी 'मेट्रो ३' या भूमिगत मार्गिकेला मिळणार असून, केंद्रीय अर्थसाह्याचा तो अंतिम टप्पा असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी राज्यातील सर्वाधिक लांबीची भूमिगत मार्गिका आहे. आंदोलनासह विविध कारणांनी विलंब झाल्याने २३ हजार १३६ कोटी रुपयांचा हा प्रकल्प ३७ हजार २७५ कोटी रुपयांवर गेला आहे. यामुळेच प्रकल्पातील केंद्र सरकारच्या खर्च हिस्स्यातही वाढ झाली आहे. त्या अनुषंगाने राज्य सरकारने वाढीव प्रकल्पखर्चानुसार वाढीव निधीची मागणी केंद्राकडे केली होती. त्याला मंजुरी याआधीच मिळाली होती. त्या निधीची तरतूद मात्र अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. याबाबतच्या सूत्रांनुसार, या प्रकल्पासाठी 'जायका'कडून जवळपास ५२ टक्के अर्थसाह्य मिळाले आहे. केंद्र व राज्य सरकारचा हिस्सा प्रत्येकी १०.४ टक्के आहे. प्रकल्पाच्या मूळ खर्चानुसार केंद्र सरकारने २४०२ कोटी रुपयांचा निधी आधीच दिला आहे. त्यानंतर वाढीव खर्चानुसार १२९७ कोटी रुपयांची मागणी केंद्राकडे करण्यात आली होती. त्यातील १०४२ कोटी रुपये अर्थसंकल्पाद्वारे या प्रकल्पासाठी देण्यात आले आहेत. हा आता 'मेट्रो ३'साठी केंद्राकडून मिळणारा अंतिम निधी असेल. अर्थसंकल्पात देशभरातील मेट्रो प्रकल्पांसाठी २१ हजार २४७.९४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यांत मेट्रो ३साठीची १०४२ कोटींची तरतूद ही एकूण निधीच्या जवळपास पाच टक्के आहे. दरम्यान, देशभरातील प्रकल्पांसाठीच्या २१ हजार २४७.९४ कोटी रुपयांच्या तरतुदीत केंद्र सरकारच्या प्रत्यक्ष भागीदारीचा आकडा ३३६४.५१ कोटी रुपये आहे. तर १६ हजार ७९१.४१ कोटी रुपयांचे अर्थसाह्य केंद्र सरकार या मेट्रो प्रकल्पांना करणार आहे.